PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Pinjara
Year: 1972

Song: Ishakchi Ingali Dasali
Lyricist: Jagdish Khebudkar

मी एकलीच निजले
रातीच्या अंधारात
नको तिथंच पडला
अवचित माझा हात
हाताखालती नांगा काढून
वैरीण ती बसली
गं बाई मला
इश्काची इंगळी डसली
गं बाई मला
इश्काची इंगळी डसली
बाई गं
बाई गं
अगं बाई बाई बाई बाई
इश्काची इंगळी डसली
खरचं हिला इश्काची इंगळी डसली
बाई गं
बाई गं

मारली किंकाळी कळ लई आली
मारली किंकाळी कळ लई आली
उरी घामानं भिजली चोळी
अंगाअंगाची काहीली झाली
अंगाअंगाची काहीली झाली
सांगा ही कळ कसली
बाई मला
इश्काची इंगळी डसली
गं बाई मला
इश्काची इंगळी डसली
बाई गं

बाई गं
अगं बाई बाई बाई बाई
इश्काची इंगळी डसली
अहो दाजी हिला इश्काची इंगळी डसली
बाई गं
बाई गं

साऱ्या घरात फिरले बाई गं
साऱ्या घरात फिरले बाई गं
मला औशिद गावलं न्हाई गं
तंवर कुणाची चाहूल आली
तंवर कुणाची चाहूल आली
खूण खूणेला पटली
बाई मला
इश्काची इंगळी डसली
गं बाई मला
इश्काची इंगळी डसली
बाई गं
बाई गं
अगं बाई बाई बाई बाई
इश्काची इंगळी डसली
अहो भावजी हिला इश्काची इंगळी डसली
बाई गं
बाई गं

ह्या इंगळीचा कळला इंगा
ह्या इंगळीचा कळला इंगा
खुळ्यावानी मी घातला पिंगा
मंतर घाला हलका हलका

मंतर घाला हलका हलका
नार चुकून फसली
बाई मला
इश्काची इंगळी डसली

गं बाई मला
इश्काची इंगळी डसली
बाई गं
बाई गं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*